डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

शिक्षणशास्त्र विभाग

प्रकरण दोन

माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणांवरील आ-बंधने

| | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| (एक) | आपली रचना, कार्य आणि कर्तव्ये यांचा तपशील | रचना :- विभागाची रचना दोन स्तरावर केली आहे.<br>अ) प्रशासकीय :- यात विभागप्रमुख, टंकलेखक व शिपाई यांचा अंतर्भाव आहे.<br>आ) शैक्षणिक :- यात विभागातील विभागप्रमुख आणि शिक्षक यांचा अंर्तभाव आहे.<br>कार्य आणि कर्तव्ये :- (अ) प्रशासकीय कार्य<br>१) विभागप्रमुख - विभागातील अध्यापन - अध्ययन व संशोधन कार्य सुरळीत चालविणे. संपूर्ण विभागांचे नियंत्रण करणे, हाताखालील सर्व कर्मचा-यांकडून विभागाचे काम सुरळीतपणे होईल याची खात्री करुन घेणे विभागाचे उत्तरदायित्व स्विकारणे प्रवेश प्रक्रिया, चर्चासत्र, एम.एड., एम.फिल. शिक्षणक्रमाशी निगडीत सर्व कामे करणे.<br>२) टंकलेखक - विभागातील नेमून दिलेली कार्यालयीन सर्व कामे वेळेचे बंधन पाळून करणे.<br>३) शिपाई - वरिष्ठांनी सांगितलेली कामे करणे.<br>आ) शैक्षणिक कार्य : अध्ययन - अध्यापन व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणारे उपक्रम राबविणे अंतर्गत मूल्यमापन चाचण्या, परीक्षा घेणे संशोधन कार्य करणे व करविणे. |
| दोन | आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये | विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये वरील प्रमाणे होत. |
| तीन | निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली | विभागाअंतर्गत शैक्षणिक कार्याविषयक निर्णय विभागीय सदस्यांच्या बैठकीत सर्वानुमते घेतले जातात. विद्यापीठाच्या इतर प्रभागाशी संबंधित कार्यासंबंधी निर्णय संबंधीत प्रभागाकडून घेतला जातो. |
| चार | स्वत:ची कार्यो पार पाडण्यासाठी त्यांच्याकडून ठरण्यात आलेली मानके | कामाची व्यापकता पाहून कामाचे नियोजन करणे आणि नियोजन आखणी करुन कामे वेळेवर पार पडतील याची काळजी घेणे. वेळेचे बंधन पाळणे इत्यादी. |
| पाच | त्यांने स्वीकारलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना. नियमपुस्तिका आणि अभिलेख. | विद्यापीठाने वेगवेगळी नियम, परिनियम, सूचना, आदेश यांचे पालन करुन कर्मचारी वर्गाकडून नियमाचे भंग होणार नाही याबाबत काळजी घेणे. वेळेचे बंधन पाळणे इत्यादी. |

| | | |
|---|---|---|
| सहा | त्यांच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांचे विविध प्रवर्गातील विवरण | कार्यालयातील जुन्या व नव्या दस्तऐवजांची वर्गवारी करुन जतन करणे. |
| सात | आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील | शैक्षणिक कार्य विद्यार्थी पाठयक्रम इ. साठी चर्चासत्रे इत्यादी साठी शिक्षकांच्या मतांचा आढावा घेतला जातो. |
| आठ | आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींचे मिळून बनलेल्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे अशा बैठकींचा कार्यवृत्त व जनतेला पाहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबत विवरण | संस्कृत विभागातील शैक्षणिक व प्रशासकीय कार्यांसाठी होणा-या बैठकांची कार्यवृत्ते सर्व लोकांसाठी खुले नाहीत. विविध शैक्षणिक व प्रशासकीय कार्यांची इतिवृत्ते विद्यापीठाच्या संबंधित विभागांना व संबंधितांना कळविली जातात. |
| नऊ | आपल्या अधिका-यांची आणि कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पध्दती | विभागात काम करणा-या अधिका-यांची आणि कर्मचा-यांची निर्देशिका आस्थापना विभागाकडून उपलब्ध आहे. |
| दहा | आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पध्दती | याबाबत विद्यापीठाच्या आस्थापना विभागाकडे सदरील माहिती उपलब्ध आहे. |
| अकरा | सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रक्कमांचा अहवाल | या सर्व योजनांचा प्रास्ताविक खर्च दर्शविणारा अर्थसंकल्प वित्त व लेखा विभागाकडून सादर केला जातो. अर्थ संकल्पाची प्रत लेखा विभागात उपलब्ध असते. |
| बारा | अर्थसाहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत व वाटपलेल्या रकमा आणि कशा कार्यक्रमाच्या लाभधिका-यांचा तपशील | अर्थसाहाय्य अंमलबजावणी कार्यक्रम हया विभागाकडे नाही. |
| तेरा | ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत, अशा व्यक्तींचा तपशील | सवलती, परवाने किंवा प्राधिकार पत्रे हया विभागातर्फे दिली नाहीत. |
| चौदा | इलेक्टॉनिक स्वरुपात स्वतःकडे उपलब्ध असलेल्या किंवा ताब्यात असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील | विभागाच्या विविध कार्यांची माहिती विभागात उपलब्ध आहे. |
| पंधरा | माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणा-या सूविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील | ग्रंथालयाचा तपशील विद्यापीठाच्या ग्रंथालयाकडून उपलब्ध करुन घेता येईल. |
| सोळा | जन माहिती अधिका-यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील | हि माहिती विद्यापीठाच्या आस्थापना विभागाकडे उपलब्ध आहे. |
| सतरा | विहीत करण्यात येईल अशी इतर माहिती, प्रसिध्द करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशाने अद्यावत करील. | विहीत करण्यात येईल अद्यावत तयार करण्यात येईल व प्रसिध्द केली जाईल. |

| | | |
|---|---|---|
| ग | ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचले अशी महत्वाची धोरणे आखतांना आणि असे निर्णय जाहीर करतांना सर्व संबंधीत वस्तुस्थिती प्रसिध्द करील. | ज्यामुळे बाधा पोहोचले अशी महत्वाची धोरणे आखतांना आणि असे निर्णय जाहीर करतांना सर्व संबंधीत वस्तुस्थिती प्रसिध्द करण्यात येईल. |
| घ | आपल्या प्रशासकिय किंवा न्यायिकत्व निर्णयांबाबतची कारणे बाधीत व्यक्तिला कळविले. | आपल्या प्रशासकीय किंवा न्यायिकत्व निर्णयांबाबतची कारणे बाधीत व्यक्तिला कळविण्यात येईल. |
| २ | माहिती मिळविण्यासाठी लोकांना या अधिनियमांचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा यासाठी नियमित कालांतराने लोकांना इंटरनेटसह, संपर्काच्या विविध साधनांव्दारे स्वतःहून माहिती पुरविण्यासाठी पोटकलम (१) च्या खंड (ख) च्या आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणात सतत प्रयत्नशील राहील. | लोकांना हया नियमांचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा यासाठी नियमित कालांतराने लोकांना इंटरनेट आणि संपर्काच्या विविध साधनांव्दारे स्वतःहून माहिती पुरविण्यात येईल. |
| ३ | पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणांत आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरुपात आणि अशा रितीने प्रसारित करण्यात येईल. | पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणांत लोकांना सहजपणे सूचना फलक, वृत्तपत्रे, जाहीर घोषणा, प्रसारमाध्यमांकडून ध्वनिक्षेपण, इंटरनेट यांच्याव्दारे सर्व लोकांना उपलब्ध होईल. |
| ४ | पुरेपुर मोबदला देणारा खर्च, स्थानिक भाषा, आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वात प्रभावी पध्दत या बाबी विचारांत घेवून, सर्व माहिती प्रसारीत करण्यात येईल आणि यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे शक्यतो इलेक्ट्रानिक स्वरुपात (फॉरमॅट) ती माहिती मोफत किंवा विहीत करण्यात येईल इतक्या माध्यमाच्या खर्चाएवढया किमतीला किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढया किमतीला सहजपणे उपलब्ध असावी. | प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणांत लोकांना सूचना फलक, वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच सदरील माहिती राज्य जन माहिती अधिका-यांमार्फत माहितीपुरविण्यात येईल. |

आपला विश्वासू,

डॉ. पी.बी.पगारे
विभाग प्रमुख
शिक्षणशास्त्र विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
शिक्षणशास्त्र विभाग

सं.क्र./ शिक्षणशास्त्र वि./२००७-०८/ दि. ०८.०७.२००८

प्रति,
मा. कुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

विषय :- माहिती अधिकार अधिनियमातातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यासंबंधी
अधिनियमातील कलम ४ (१) ची माहिती पाठविणे बाबत.

संदर्भ :- संदर्भ क्र. आस्था/आरओ/२००८/६७९१-६८९५ दिनांक ०१.०७.२००८

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रांव्दारे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ मध्ये नमूद विविध प्रकारच्या १७ बार्बींवरील मुददेनिहाय माहिती पाठवित आहोत.

तरी कृपया स्वीकृती दयावी ही विनंती.

या पत्राची एक प्रत मा. जनसंपर्क अधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या माहितीस्तव.

आपला विश्वासू,

डॉ. पी.बी.पगारे
विभाग प्रमुख
शिक्षणशास्त्र विभाग